**महाराष्ट्र शासन**

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**

छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ अंतर्गत शेतक-यांच्या कर्जमाफीबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाच्या अंमलबजावणीच्या मंत्रालय स्तरावरील कामासाठी, खालील संवर्गातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी/कर्मचारी यांच्यामधून सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांच्या तात्पुरत्या नियुक्तीकरिता सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १७/१२/२०१६ च्या शासननिर्णयास अनुसरून पॅनल करण्यास्तव इच्छुकता मागविण्यासाठी सदर जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे.

१) सह सचिव/उप सचिव पदावरील सेवानिवृत्त अधिकारी-१

२) अवर सचिव/कक्ष अधिकारी पदावरून सेवानिवृत्त अधिकारी–१

३) सहायक कक्ष अधिकारी पदावरून सेवानिवृत्त अधिकारी-१

२. इच्छुक अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांचे अर्ज खालील माहितीसह उप सचिव (आस्था १), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, तिसरा मजला, दालन क्रमांक ३१७, मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२ (दुरध्वनी क्रमांक ०२२-२२८४४८३२) यांचेकडे दिनांक २३/१०/२०१७ पर्यंत (सकाळी ११.३० पर्यंत) सादर करावेत.

१) अर्जदाराचे संपूर्ण नाव व पदनाम

२) सेवानिवृत्ती दिनांक

३) ज्या विभागातून सेवानिवृत्त झाले त्या विभागाचे नाव

४) सेवानिवृत्तीच्या वेळचे ग्रेड वेतन

५) सेवानिवृत्त होतेवेळी विभागीय चौकशी सुरू अथवा प्रलंबित होती किंवा कसे

६) सध्याच्या निवासस्थानाचा पत्ता

उपरोक्त मुदतीनंतर आलेल्या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही. नियुक्ती प्रथमत: दोन महिन्यांसाठी राहील. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी उपरोक्त संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवेची आवश्यकता जोपर्यंत राहील तोपर्यंतच सदर नियुक्तीचा कालावधी वाढविण्यात येईल.

३. कर्जमाफीसंदर्भातील काम तातडीच्या स्वरूपाचे असल्यामुळे त्याची तीव्रता विचारात घेता सदर कामासाठीचा रोजचा कालावधी निश्चित नाही. तसेच गरज भासल्यास सुट्टीच्या दिवशी सुध्दा कार्यालयात उपस्थित रहावे लागेल.

Sudin Gaikwad

Digitally signed by Sudin Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing Tax Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=20315cd32e197cc2334676dbe1f09f90b2334eddf7e75d09609003b414273f73, cn=Sudin Gaikwad
Date: 2017.10.12 11:30:50 +05'30'

**(डॉ. सुदिन गायकवाड)**

उप सचिव, महाराष्ट्र शासन

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग